जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 DEC 2024
पुण्यनगरी

# विद्यार्थ्यांची देवनागरी स्वाक्षरीची शपथ

**कोल्हापूर :** थोर कवी चिन्नास्वामी सुब्रमण्यम भारती यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागात भारतीय भाषा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी देवनागरीमध्येच स्वाक्षरी करण्याचा संकल्प व्यक्त केला. विद्यार्थी गुलामगौस तांबोळी यांनी उर्दू आणि हिंदी, हर्षिता माने हिने मराठी, महेक नदाफ व सुप्रिया पवार यांनी कन्नड भाषेचे महत्त्व सांगितले. हिंदी विभागप्रमुख तृप्ती करेकट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. हिंदी विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. प्रकाश मुंज, डॉ. संतोष कोळेकर, डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. प्रकाश निकम आदींनी सहभाग घेतला.